आ नो भद्रा: ऋतवो यन्तु विश्वा:

DANG SEVA MANDAL'S

# ARTS & COMMERCE COLLEGE UMBARTHAN

## TAL. SURGANA, DIST. NASHIK- 422 211.

(Affiliated to Savitribai Phule Pune University)

ID No. : PU/NS/AC/164/2012





**B.A.**

**B.Com.**




Website : www.dsmcollegeumbarthan.ac.in
Email : ubcollegecontactus@gmail.com

(Scan This Code For More Information)

**(Read Prospectus thoroughly and carefully)**

माहिती पत्रक जपुन ठेवावे

# PROSPECTUS

Estd. Year 2012



**संस्थापक**
कै. कर्मवीर दादासाहेब बिडकर



**प्रेरणास्थान**
कै. डॉ. विजयजी बिडकर



प्रेरणास्थान - मा. श्रीमती हेमलताताई विजय बिडकर

## * महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये *

१. दुर्गम आदिवासी भागात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे महनीय कार्य.
२. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी निकोप शैक्षणिक वातावरण.
३. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष.
४. आर्थिक दृष्ट्या दूर्बल विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना.
५. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासाची संधी.
६. व्यवसाय मार्गदर्शसाठी नियमीत तासिका.
७. आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना सहाय्य.
८. उत्कृष्ट जिमखाना सुविधा.
९. विविध विषयांवर तज्ञांची व्याख्याने.
१०. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम.
११. राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण जनजागृती, श्रमप्रतिष्ठा इ. विषयी प्रबोधन.
१२. समर्थ भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम.
१३. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन.
१४. महाविद्यालय व जनशिक्षण संस्थान नाशिक यांचे सहकार्यातुन रोजगाराभिमुख अभ्यासक्रम राबविणे.
१५. व्यवसाय व कौशल्य विकास अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण.
१६. मोफत वाय-फाय सुविधा व संगणक प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध.
१७. व्यक्तीगत समुपदेशन.

आ नो भद्रा: ऋतवो यन्तु विश्वा:

DANG SEVA MANDAL'S

# ARTS & COMMERCE COLLEGE UMBARTHAN

## TAL. SURGANA, DIST. NASHIK- 422 211.

(Affiliated to Savitribai Phule Pune University)
ID No. : PU/NS/AC/164/2012

# PROSPECTUS

**Programs - B.A., B.Com**

Website : www.dsmcollegeumbarthan.ac.in
Email : ubcollegecontactus@gmail.com

**(Read Prospectus thoroughly and carefully)**
माहिती पत्रक जपुन ठेवावे

# डांग सेवा मंडळ

इ. १९३० मध्ये महात्मा गांधीनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. गांधीजींनी तरूणांना शाळा सोडुन स्वातंत्र्य लढ्यात सामील होण्याचे आवाहन केले. हैद्राबाद येथे शिकणारे मा. दादासाहेब बिडकर, मा. गोविंदराव श्रॉफ, मा. नारायणराव चव्हाण, मा. अच्युतराव देशपांडे, मा. रामभाऊ कडेपुरकर, मा. दामोदरदास मुंदडा ह्या व्यक्तींनी महात्मा गांधींच्या आदेशानुसार स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस नेते श्री. शंकरराव देव यांच्या आज्ञेवरून श्री. दादासाहेब बिडकर व श्री. दादासाहेब पोतनीस यांची काँग्रेस पक्षाचे काम करण्यासाठी बागलाण तालुका निवडला.

सन १९३७ मध्ये काँग्रेसचा प्रचार करतांना बागलाणच्या आदिवासी भागात आदिवासी सेवेचे काम करीत असणाऱ्या मिस्. जे. एल. लॅथॅम या मिशनरी बाईंशी मा. दादासाहेब बिडकर यांचा परिचय झाला. मिस्. जे. एल. लॅथॅम वय वर्ष ७८ असतांना आदिवासी सेवेचे काम करीत होत्या. लंडनच्या एका कॉमर्स कॉलेजच्या निवृत्त प्राध्यापिका होत्या. सेवानिवृत्तीनंतर मिशनरी वृत्तीने सेवा कार्य त्यांनी अंगिकरले होते. डांग सेवा मंडळाच्या निर्मिती मागील प्रेरणा मिस्. लॅथॅमबाई होत्या.

२३ जुन १९३७ ला ताहाराबाद येथे डांग सेवा मंडळाची पहिली सभा झाली. मिस्. लॅथॅम या अध्यक्षा तर मा. दादासाहेब बिडकर सचिव म्हणून निवडले गेले अशा रितीने आदिवासीच्या शैक्षणिक विकासाकरिता समर्पित असणाऱ्या संस्थेचा उदय झाला. इ. स. १९३७ पासुन सुमारे ८५ वर्षात संस्थेने पेठ, सुरगाणा, कळवण, दिंडोरी, सटाणा या अदिवासी बहुल तालुक्यात आश्रमशाळा, विद्यार्थिनी वसतीगृह, माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये सुरू केलीत, २०२२ मध्ये डांग सेवा मंडळ या रोपाचे ८५ व्या वर्षात वटवृक्षात रूपांतर झाले.

२०१२ मध्ये संस्थेने आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्या म्हणून उंबरठाण, जि. नाशिक येथे कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण या महाविद्यालयाची स्थापना केली. गेल्या १० वर्षात महाविद्यालय वेगाने विकसित होत आहे.

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण

# ता. सुरगाणा, जि. नाशिक

## महाविद्यालय प्रवेश समिती

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद | समितीतील पद |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. ए. एस. फापाळे | प्र. प्राचार्य | अध्यक्ष |
| २. | प्रा. ई. पी. आहेर | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ३. | प्रा. के. जे. थविल | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ४. | प्रा. एस. के. पवार | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ५. | प्रा. के. बी. काळे | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ६. | प्रा. ए. डी. कोळी | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ७. | प्रा. यु. पी. देशमुख | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ८. | प्रा. एच. के. महाले | सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ९. | प्रा. एम. के. गावित | ग्रंथपाल | सदस्य |
| १०. | श्री. अनिल एस. कदम | लिपीक | शिक्षकेतर प्रतिनिधी |

## कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार समिती

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद | मोबाईल नंबर. |
|---|---|---|---|
| १ | प्रा. श्रीमती फापाळे अनिता शंकर | अध्यक्ष | ९४२३७३७६१९ |
| २. | प्रा. श्रीमती थविल कलावती जयवंत | सदस्य | ७५८८९५६८३८ |
| ३. | प्रा. श्री. आहेर एकनाथ पंडित | सदस्य | ९६८९२२९३५७ |
| ४. | प्रा. श्री. काळे किशोर भिकाजी | सदस्य | ९७६७८८४५७३ |
| ५. | प्रा. श्रीमती महाले हेमलता कृष्णा | सदस्य | ९७६७७४५०६३ |
| ६. | श्री. मधुकर काशिराम गावित | सदस्य | ९३१६२२७२०४ |
| ७. | श्री. अनिल सुकदेव कदम | सदस्य | ८२०८४४७२५१ |
| ८. | प्रा. श्रीमती देशमुख उमाताई प्रकाश | सचिव | ७८२०९९०६१९ |

१) **कला शाखा (Art Faculty) –** एफ.वाय., एस.वाय., टी.वाय.बी.ए. या वर्गाकरिता कोणते विषय घ्यावेत यासंबंधीची माहिती.

| F.Y.B.A CBCS Pattern -2019 Sem. I & II | | S.Y.B.A.CBCS Pattern -2019 Sem.III & IV | | T.Y.B.A. CBCS Pattern -2019 Sem.V & VI | |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Subject | Sr.No. | Subject | Sr.No. | Subject |
| 1 | Comp. English | 1 | Comp. English | 1 | Comp. English |
| 2 | Marathi | Any One of the following as Special Subject | | Any One of the following as Special Subject | |
| 3 | Economics I & II | | Marathi S1 | | Marathi S3 |
| 4 | Politics | 1 | Marathi S2 | 1 | Marathi S4 |
| 5 | History | | Marathi G2 | | Marathi G3 |
| 6 | Geography | | Marathi - Skill Based | | Marathi - Skill Based |
| 7 | Physical Education | | Economics S1 | | Economics S3 |
| 8 | Democracy, Election and Governance | 2 | Economics S2 | 2 | Economics S4 |
| | | | Economics G2 | | Economics G3 |
| | | | Economics - Skill Based | | Economics - Skill Based |
| | | | Politics S1 | | Politics S3 |
| | | 3 | Politics S2 | 3 | Politics S4 |
| | | | Politics G2 | | Politics G3 |
| | | | Politics - Skill Based | | Politics - Skill Based |
| | | | History S1 | | History S3 |
| | | 4 | History S2 | 4 | History S4 |
| | | | History G2 | | History G3 |
| | | | History - Skill Based | | History - Skill Based |
| | | Any Two of the following Except Special Subject | | Any Two of the following Except Special Subject | |
| | | | Marathi G2 | | Marathi G3 |
| | | | Economics G2 | | Economics G3 |
| टीप – विद्यापीठ नियमानुसार अनिवार्य असलेले व महाविद्यालय शैक्षणिक विभागांमार्फत निश्चित केलेले अधिकचे क्रेडिट कोर्सेस विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे अनिवार्य राहिल. | | 5 | Politics G2 | 5 | Politics G3 |
| | | | Hisotry G2 | | Hisotry G3 |
| | | | Geography G2 | | Geography G3 |
| | | | Compulosry Subject | 6 | Genoric Elective - Compulasory subject |
| | | 1 | Environmental Awarness | | |
| | | 2 | Modern Indian Languages (MIL) | | |

२) **वाणिज्य शाखा** ( Commerce Faculty ) – एफ.वाय., एस.वाय.,टी.वाय.बी.कॉम. या वर्गाकरिता कोणते विषय घ्यावेत या संबंधीची माहिती.

| F.Y.B.Com. CBCS Pattern-2019 Sem.I & II | | S.Y.B.Com. CBCS Pattern-2019 Sem.III & IV | | T.Y.B.Com. CBCS Pattern-2019 Sem.V & VI | |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Subject | Sr.No. | Subject | Sr.No. | Subject |
| 1 | Comp. English I & II | 1 | Business Communication I & II | 1 | Business regulatory Framework (M.Law) I & II |
| 2 | Financial Accounting I & II | 2 | Corporate Accounting I & II | 2 | Advance Accounting I & II |
| 3 | Business Economics I & II (Micro) | 3 | Business Economics I & II (Macro) | 3 | International Economics I & II |
| 4 | Computer Concepts & Application I & II | 4 | Business Management I & II | 4 | Auditing & Taxation I & II |
| 5 | Commercial Geography I & II | 5 | Banking & Finance -I I & II | 5 | Banking & Finance - II - I & II |
| 6 | Business Environment & Entrepreneurship I & II | 6 | Elements of Company Law I & II | 6 | Banking & Finance-III - I & II |
| 7 | Marathi I & II | 7 | Business Communication Pract. I & II | 7 | Auditing & Taxation Practical I & II |
| 8 | Financial Accounting Practical I & II | 8 | Banking & Finance Practical | 8 | Banking & Finance-II Practical I & II |
| 9 | Physical Education Scheme (Proj.) | | **Compulsory Subject** | 9 | Banking & Finance-III Practical / Intership I & II |
| 10 | Value Added Course | 9 | Environment Awareness | | |
| 11 | Democracy, Election and Governance | | | | |

टीप – विद्यापीठ नियमानुसार अनिवार्य असलेले व महाविद्यालय शैक्षणिक विभागांमार्फत निश्चित केलेले अधिकचे क्रेडिट कोर्सेस विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे अनिवार्य राहिल.

## DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE OUTCOMES

**Objective: -**

1. To acquaint students with the important features of the Constitution of India and with The Basic framework of Indian Government.
2. To familiarize students with the working of the Constitution of India.
3. To introduce the students meaning of democracy and the role of the governance.
4. To help them understand the various approaches to the study of democracy and governances.
5. Major traditions of thought that have shaped political discourse in different parts of the world.
6. The history of political thought as a series of critical, interconnected and open-ended conversations about the ends and means of the good life.
7. Complex relationship between the communication, media and power politics.
8. Indian context of political Journalism.
9. Role of different political ideologies and their impact in politics.
10. The essence of Public Administration lies in its effectiveness in translating the governing philosophy into programmes, policies and activities and making it a part of community living.
11. The recent developments and particularly the emergence of New Public Administrations are incorporated within the larger paradigm of democratic legitimacy.
12. This paper deals with concepts and dimensions of International Relations and makes an analysis of different theories highlighting the major debates and differences within the different theoretical paradigms.
13. It's highlights various aspects of conflict and conflicts resolution, collective security and in the specificity of the long period of the post second world war phase of the cold war, of Detent and Deterrence leading to theories of rough parity in armaments.
14. To introduce the students the structure of Local Self Government in Maharashtra.
15. This Course is an introduction to the political process in Maharashtra with special reference to regionalism sub-regionalism and Samyukta Maharashtra Movement.

## विशेषस्तर विषय – राज्यशास्त्र :

**उद्दिष्ट्ये –**

१. भारतीय संविधानाची तोंड ओळख करून देणे.
२. भारतीय संविधानाचा मुलभूत पाया व प्रमुख वैशिष्ट्यांची जाणीव करून देणे.
३. लोकशाहीचा अर्थ आणि लोकशाही शासन व्यवस्थेची माहिती करून देणे.
४. लोकशाही शासन व्यवस्थेच्या अभ्यासाचे विविध दृष्टिकोन समजुन घेण्यासाठी मदत करणे.
५. पाश्चिमात्य राजकीय विचारवंतांची माहिती करून देणे.
६. विविध पाश्चिमात्य राजकीय विचारधारेची माहिती समजावुन घेणे.
७. राजकीय पत्रकारीतेचा अर्थ, विविध माध्यमे व भारतीय राजकीय पत्रकारितेचा इतिहास आणि राजकारणातील भुमिका याविषयी माहिती करून देणे.
८. राजकीय विचारप्रणालीची ओळख करून देणे.
९. जागतिक प्रमुख राजकीय विचारधारेची भुमिका आणि त्यांचा राजकारणातील प्रभाव यांची जाणीव करून देणे.
१०. लोकप्रशासन म्हणजे काय ? लोककल्याणकारी धोरणे, कार्यक्रम व तत्वे समजावुन देणे.
११. अलीकडील घडामोडी आणि विशेषत: नव लोकप्रशासनाचा उदय यांची माहिती समजुन देणे.
१२. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संकल्पना, विविध सिद्धांत आणि प्रमुख वादविवाद यांची माहिती समजावुन घेणे.
१३. आंतरराष्ट्रीय संघटना, दुसरे महायुद्ध, शीतयुद्ध, जागतिकीकरण व अलिप्ततावाद आदी, संकल्पनाची माहिती समजावुन घेणे.
१४. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संरचनेची ओळख करून देणे.
१५. महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेचा परिचय व प्रादेशिकता – उपप्रादेशिकता आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विशेष संदर्भासह ऐतिहासिक माहितीची जाणीव करून देणे.

## DEPARTMENT OF ECONOMICS

**Objective: -**

1. Ability to develop awareness on the various new developments in the different sectors of an economy – agriculture, industry, services, banking, etc.
2. At the end of the course, the student should be able discuss and debate on the various issues and challenges facing the Indian Economic Environment.
3. To demonstrate that the theories discussed in class will usually be applied to real-life situations.
4. To familiarize students with the differences between microeconomics and macroeconomics
5. Study the steps of research.
6. Collect the data related to any schemes of your locality and present in front of the students.
7. Knowledge of Economic Development & Planning.
8. Analyze the recent changes in the export - import policies of India.
9. Analyze the Budget, Public Debt, Centre-State Financial Relationship.
10. To understand the tools and theories of economics for solving the problem of decision making by consumers and producers.
11. To create the awareness about Banking Sector Reforms
12. To understand the role of various committees on Banking Sector Reforms.
13. Enablestudentstogainaninsightinto the functioning and role off inancialinstitutions in the Indian Economy.
14. Understand the legalaspects of Banking transaction sand it simplications as Banker and Customer.

## विशेषस्तर विषय – अर्थशास्त्र

**उद्दिष्ट्ये –**

१. शेती, उद्योग, सेवा, बँकिंग इत्यादी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील विविध नवीन घडामोडींवर जागरूकता निर्माण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
२. अभ्यासक्रमाच्या शेवटी, विद्यार्थी भारतीय आर्थिक पर्यावरणासमोरील विविध समस्या आणि आव्हानांवर चर्चा आणि वादविवाद करू शकला पाहिजे.
३. वर्गात चर्चा केलेले सिद्धांत सहसा वास्तविक जीवनातील परिस्थितीवर लागू केले जातील यासंदर्भात अभ्यास करणे.
४. सूक्ष्म अर्थशास्त्र आणि समग्र अर्थशास्त्र मधील विद्यार्थ्यांना परिचित करणे.
५. संशोधनाच्या पायऱ्यांचा अभ्यास करणे.
६. आपल्या परिसरातील कोणत्याही योजनांशी संबंधित माहिती कोणत्या स्वरूपात गोळा करायचे याचे ज्ञान देणे.
७. आर्थिक विकास आणि नियोजनाचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोचविणे.
८. भारताच्या निर्यात आयात धोरणांमध्ये अलीकडील बदलांचे विश्लेषण करण्यास.
९. बजेट, सार्वजनिक कर्ज, केंद्र–राज्य आर्थिक संबंध यांचे विश्लेषण करणे.
१०. ग्राहक आणि उत्पादकांद्वारे निर्णय घेण्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी अर्थशास्त्राची साधने आणि सिद्धांत समजुन घेणे.
११. बँकिंग क्षेत्रातील सुधारणांविषयी जागरूकता निर्माण करणे.
१२. बँकिंग क्षेत्र सुधारणांवर विविध समित्यांची भुमिका समजून घेणे.
१३. विद्यार्थ्यांना भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तीय संस्थांच्या कार्यपद्धती आणि भुमिकेबद्दल अंतर्दृष्टी प्राप्त करण्यास सक्षम करणे.
१४. बँकिंग व्यवहारांचे कायदेशीर पैलू आणि बँकर आणि ग्राहक म्हणून त्याचे परिणाम समजुन घेणे.

## HISTORY SPECIAL SUBJECT OUT COME

**Objective: -**

1. Gaining a Basic Knowledge of ancient civilizations and cultures of the past.
2. Understanding the source, importance of heritage sites and the underlying concept of history.
3. Gaining knowledge of general concepts of chronology, basic concepts of history and values like tolerance.
4. Introducing students to the forces of international politics.
5. Preparing yourself for the elements of history in competitive exams.
6. Introducing ancient Indian art and architecture.
7. Introducing the social, economic, political, cultural and religious conditions of medieval India.
8. Introducing the ancient scripts .

## विशेषस्तर विषय – इतिहास

**उद्दिष्ट्ये –**

१. भूतकाळातील प्राचीन सभ्यता आणि संस्कृतीचे मुलभूत ज्ञान मिळविणे.

२. स्त्रोत, वारसा स्थळांचे महत्व आणि इतिहासाची अंतर्भूत कल्पना समजुन घेणे.

३. कालगणनेची सामान्य कल्पना, इतिहासाची मुलभुत संकल्पना आणि सहिष्णूतेसारख्या मुल्यांचे ज्ञान मिळवणे.

४. आंतरराष्ट्रीय राजकारणातील शक्तीचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

५. स्पर्धा परिक्षामध्ये इतिहासाच्या घटकासाठी स्वत:ला तयार करणे.

६. प्राचीन भारतीय कला आणि वास्तुकलांचा परिचय करून घेणे.

७. मध्ययुगीन भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीचा परिचय करून घेणे.

८. प्राचीन लिपींचा परिचय करून घेणे.

## PROGRAM OUTCOMES BELONGS TO BACHELOR OF COMMERCE

**Objective: -**

1. The Commerce education is dedicated to developing tomorrow's leaders, managers, and professionals.
2. Capable students to understand and to assimilate communication and soft skills required for the business world.
3. Develop the abilities to become a successful entrepreneur, made able to prepare a business plan, set up and manage own business setup.
4. To understand how to maintain day to day business transactions and books of accounts of small scale and medium scale industrial units.
5. Develop skills of computation of income, submission of Income Tax Returns and knows the types and sources of various taxes.
6. Develop the abilities to make day to day bank transactions for personal and entrepreneurial purpose.
7. Literate students about daily working procedures of Financial, Non-financial and Insurance sector institutions.
8. To be aware the students about various Acts, sections and sub-sections related to commercial sector.
9. To be aware the students about basic concepts and terminologies related to computer.
10. To meet the growing needs of the business society, there is greater demand for sound development of commerce education.

## वाणिज्य पदवी अभ्यासक्रमाचे उद्देश

**उद्दिष्ट्ये –**

१. वाणिज्य शिक्षण हे उद्याचे नेते, व्यवस्थापक आणि व्यावसायिक विकसित करण्यासाठी समर्पित आहे.
२. विद्यार्थ्यांना व्यावसायिक संवाद कौशल्य आणि सॉफ्ट स्किल्स आत्मसात करण्यास सक्षम बनविणे.
३. विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी उद्योजक होण्यासाठीची क्षमता तसेच व्यवसाय योजना तयार करण्याची क्षमता विकसित करणे.
४. लघु आणि मध्यम उद्योगांचे दैनंदिन व्यावसायिक व्यवहार आणि खात्यांची हिशेब पुस्तके ठेवण्याचे कौशल्ये विकसित करणे.
५. उत्पन्नाची गणना करण्याचे कौशल्य, प्राप्तिकर विवरणपत्र सादर करणे आणि विविध करांचे प्रकार आणि स्त्रोत जाणुन घेणे.
६. वैयक्तिक आणि उद्योजकीय हेतुसाठीचे दैनंदिन बँक व्यवहार करण्याची क्षमता विकसित करणे.
७. विद्यार्थ्यांना आर्थिक, गैर–वित्तीय आणि विमा क्षेत्रातील संस्थांच्या दैनंदिन कार्यपद्धतीबद्दल साक्षर करणे.
८. व्यावसायिक क्षेत्राशी संबंधित विविध कायदे आणि कलामांविषयी विद्यार्थ्यांना जागरूक करणे.
९. संगणकाशी संबंधित मुलभूत संकल्पना आणि शब्दावलींबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करणे.
१०. व्यावसायिक क्षेत्राच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी, वाणिज्य शिक्षणाची नितांत गरज आहे.

## MARATHI SPLECIALSUBJECT OUTCOME

**Objective: -**

1) To introduce various literary genres in modern Marathi literature.
2) Enabling students to understand, enjoy and analyze literature.
3) To create sweetness in the minds of students about Marathi language
4) Explain the nature and function of literature.
5) To understand the history of Marathi literature.
6) To develop linguistic skills in students.
7) To find the interrelationship between literature and society.
8) Explain the nature, features and functions of languages to the students.
9) To acquire language skills in program planning10) Introduce the concept and format of literary criticism.
11) To acquire necessary skills for publishing and editing
12) To acquire necessary skills for advertising, interview writing and editing.
13) To develop the ability of advanced linguistic skills in the students
14) To develop writing skills for media and print media.
15) Creating literacy on new media, social media.

## मराठी विशेषस्तर पेपरचे उद्देश

**उद्दिष्ट्ये –**

१. आधुनिक मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रकारांचा परिचय करून घेणे.
२. विद्यार्थ्यांना साहित्य समजण्यास, आस्वाद घेण्यासाठी आणि विश्लेषण करण्यास सक्षम करणे.
३. मराठी भाषेविषयी विद्यार्थांच्या मनात गोडी निर्माण करणे.
४. साहित्याचे स्वरूप व कार्य समजावुन सांगणे.
५. मराठी साहित्याचा इतिहास समजावुन सांगणे.
६. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्यांचा विकास करणे.
७. साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध शोधणे.
८. विद्यार्थ्यांना भाषांचे स्वरूप, वैशिष्ट्ये व कार्य समजावुन सांगणे.
९. कार्यक्रम संयोजनातील भाषिक कौशल्ये आत्मसात करणे.
१०. साहित्य समीक्षेची संकल्पना, स्वरूप यांचा परिचय करून घेणे.
११. प्रकाशन व्यवहार आणि संपादन यासाठी आवश्यक कौशल्ये मिळविणे.
१२. जाहिरात, मुलाखत लेखन आणि संपादन यासाठी आवश्यक कौशल्ये मिळविणे.
१३. विद्यार्थ्यांमध्ये प्रगत भाषिक कौशल्यांची क्षमता विकसित करणे.
१४. प्रसारमाध्यमे आणि मुद्रित माध्यमे यांच्यासाठी लेखन कौशल्ये विकसित करणे.
१५. नवमाध्यमे, समाज माध्यमांविषयक साक्षरता निर्माण करणे.

# ARTS & COMMERCE COLLEGE UMBARTHAN
# & JAN SHIKSHAN SANSTHAN, NASHIK

**Ministry of Skill Development & Entrepreneurship, Government of India (Nashik)**

**- With Collaboration -**

Jan Shikshan Sansthan Plays a vital role in providing vocational training at the doorstep of the beneficiaries in the unreached areas. Aim of Umberthan College is conducting skill up gradation program in rural and Tribal-Hilly areas of the district, while also providing academic and technical support to its target group. Provide vocational education and skill development programmes to Illiterates, neo literates, and the person having a rudimentary education level successfully implemented with mutual co-operation with our college.

**Objectives of Course -**

1) To provide quality and contemporary education through Skill Deployment and self- Employability Program.
2) To promote industrial collaboration for providing practical exposure leading to industry ready.
3) To open new vistas of learning for students through National Collaborations.
4) To provide conducive environment through pre placement training and professional development activities for providing ample opportunities of Self-Employment and entreprenurship.

## स्वयंरोजगार आणि उद्योजकतेवर शिक्षण व प्रशिक्षण अभ्यासक्रम

**(सामंजस्य करारा अंतर्गत)**

१. कौशल्य उपयोजन आणि स्वयं-उद्योजकता कार्यक्रम शिक्षण प्रक्रिया आणि प्रभावी स्त्रोत वापराद्वारे दर्जेदार आणि समकालीन शिक्षण उपलब्ध करणे.

२. उद्योगासाठी आवश्यक असलेले मुलभूत कौशल्ये विकसित करणारे ज्ञान देणे.

३. राष्ट्रीय सहकार्याद्वारे विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचे नवीन मार्ग दाखविणे.

४. कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करण्यासाठी प्री-प्लेसमेंट प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकास उपक्रमांद्वारे अनुकूल वातावरण निर्माण करणे.

| अनु.क्र. | प्रशिक्षण वर्गाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १. | टेलरींग व ब्लाऊज | १०० दिवस |
| २. | फॅशन ड्रेसेस | ३ महिने |
| ३. | साडी फॅशन डिझायनिंग व ज्वेलरींमेकिंग | १ महिना |
| ४. | बेसिक ब्युटीशियन | ६० दिवस |
| ५. | केक तयार करणे | ५ दिवस |
| ६. | रांगोळी, मेहंदी | ४ दिवस |
| ७. | अगरबत्ती तयार करणे | २ दिवस |
| ८. | फॅन्सी बॅग्ज तयार करणे | १ महिना |
| ९. | इलेक्ट्रीशियन | १ महिना |
| १०. | वेल्डिंग | २ महिने |
| ११. | सेंद्रिय शेती (विषमुक्त भाजीपाला) | - |
| १२. | बांबू बास्केट मेकर ( बांबूपासून वेगवेगळ्या वस्तु बनविणे) | - |

**आवश्यक कागदपत्रे ( साक्षांकित प्रत )**

१. एकरंगीतपासपोर्ट साईजफोटो २. रेशनकार्ड / आधारकार्ड / मतदान ओळखपत्र ३. जातीचा दाखला

## महाविद्यालयात शिकविले जाणारे अभ्यासक्रम :

महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नीत असून विद्यापीठाचे महाविद्यालयास संलग्नीकरण मिळालेले आहे.

## अभ्यास पुरक व अभ्यासक्रमेतर उपक्रम :

अभ्यासक्रम पुर्ण करतांना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात विविध विभाग कार्यरत आहे. त्या विभागांतर्गत सेवा–सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येतो.

विद्यार्थ्यांच्या सहभागाला व उपक्रमशीलतेला अधिक वाव मिळावा म्हणून संबंधीत प्राध्यापक वर्गाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांकरिता खालील उपक्रम कार्यान्वित केले जातात–

१) विद्यार्थी विकास विभाग

२) विद्यार्थिनी मंच

३) सांस्कृतिक वाङमय मंडळ

४) वक्तृत्व व वाद – विवाद मंडळ

५) स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र

६) स्वयं रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र

७) सुलभ कौशल्ये

८) सहल विभाग

९) शैक्षणिक संशोधन मंडळ

१०) राष्ट्रीय सेवा योजना

११) आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

१२) भाषा प्रयोगशाळा (Language Lab)

१३) वाणिज्य प्रयोगशाळा (Commerce Lab)

## प्रवेश नियम :

१) महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांने प्रथम माहिती पत्रकातील नियम, अटी, अभ्यासक्रम व इतर माहिती काळजीपूर्वक वाचावी व नंतरच प्रवेश अर्ज **www.accumbarthan.vriddhiedubrain.com** या वेबसाईटवर Online भरावा. माहिती पत्रक विकत घेतले म्हणजे संबंधित वर्गात प्रवेश मिळाला असे समजू नये, प्रवेश हा ठरवून दिलेल्या दिनांकांना व निर्धारित वेळेतच घेतला पाहिजे. संबंधित वर्गाचा प्रवेश घेण्याचा दिनांक उलटून गेल्यानंतर प्रवेश घ्यावयाचा असल्यास प्रतिदिनी विद्यापिठाच्या नियमाप्रमाणे प्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रथमवर्ष कला व वाणिज्य वर्गात प्रवेश घेतेवेळी पुढील कागदपत्रे प्रवेश अर्जाबरोबर जोडावीत –

अ) कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

ब) १२ वी परिक्षेच्या गुण पत्रकाची प्रमाणित सत्य प्रत.

क) योग्य त्या शुल्क – सवलतीचा छापील अर्ज मागासवर्गीय शिष्यवृत्ती अर्ज (Fee Concession Form), सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र.

ड) अन्य विद्यापीठातून या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्थलांतर दाखल्याची (T.C.) दुसरी प्रत प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील नियम ३९ नुसार ३% जागा ह्या अपंग विद्यार्थ्यांसाठी राखीव राहतील.

## पात्रता प्रमाणपत्र :

प्रथम वर्ष बी. ए. / बी. कॉम. या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला पात्रता प्रमाणपत्र द्यावे लागते. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा पात्रता अर्ज भरून त्यासोबत इ. १२ वी ची मूळ गुणपत्रिका, पदवी गुणपत्रिकेची एक प्रमाणित सत्यप्रत व टी. सी. मायग्रेशन जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जासोबत पात्रता अर्ज सादर करावयाचा असतो. विद्यार्थ्याने पात्रता अर्जाची विद्यापीठाने निर्धारित केलेली किंमत भरावयाची असते.

* प्रथम वर्ष पदवी वर्गातील विद्यार्थी / विद्यार्थिनीला वैद्यकीय तपासणी सक्तीची आहे.
* महाविद्यालयात एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात एकदा प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश अर्जात लिहिलेल्या विषयात बदल करता येणार नाही.
* द्वितीय व तृतीय बी.ए. व बी.कॉम. वर्गाच्या परीक्षेचा निकाल लागताच विद्यार्थ्यांनी संबंधित वर्गात प्रवेश घ्यावा. अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडावी.

  १) उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची सत्यप्रत २) फी सवलतीचा अर्ज / शिष्यवृत्तीचा अर्ज Online भरावा.

* पुणे विद्यापीठाशी संलग्न नसलेल्या दुसऱ्या महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्थानांतर दाखला (Migration Certificate) मिळवावा लागतो व तो प्रवेश अर्जासोबत जोडावा.
* महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांवर महाविद्यालयाने केलेले नियम व प्राचार्यांचे आदेश बंधनकारक असतील.
* कार्यालयाशी कामकाजाबाबत संपर्क साधताना विद्यार्थ्यांचे ओळखपत्र बंधनकारक राहिल.

## प्रवेश अटी :

१) महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणारा प्रत्येक विद्यार्थी हा चांगल्या वर्तनाचा आहे असे गृहीत धरले जाते. यासाठी प्रमुखांचे मत विचारात घेतले जाते. आवश्यकता वाटल्यास एखाद्या विद्यार्थ्यांबद्दल असे मत मागविले जाते हे मत प्रतिकूल असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेश दिला जात नाही. अथवा त्याला दिलेला प्रवेश रद्द होतो.

२) गैरवर्तनाबद्दल पूर्वी शिक्षा झालेला (तात्पुरत्या पोलीस कस्टडीसह), दंगाधोपा, मारहाण यातील संशयित किंवा पोलिसाकडून समाजकंटक ठरविला गेलेला विद्यार्थी प्रवेशास अपात्र राहील.

३) एखाद्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाची मालमत्ता, ग्रंथ, स्टेशनरी, क्रीडा–साहित्य, रोकड रक्कम इत्यादी गोष्टीस हानी पोहचली असेल किंवा त्यासंबंधीचा त्याच्याकडील हिशोब आलेला नसेल तर अशा विद्यार्थ्यांला प्रवेश दिला जाणार नाही.

४) प्राध्यापकांचे आदेश न पाळणे, त्यांचा अपमान करणे, विद्यार्थ्यांत फुट पाडणे, संप, मारामारी यात भाग घेणे, बाहेरील लोकांना आणून महाविद्यालयात अशांतता निर्माण करणे यासारख्या कृतींशी एखाद्या विद्यार्थ्यांचा संबंध असल्याचे आढळून आल्यास त्या विद्यार्थ्यांला प्रवेश दिला जाणार नाही. अगर दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

५) प्राचार्यांच्या मते एखाद्या विद्यार्थ्यांचे वर्तन गैर आढळल्यास त्याला प्रवेश दिला जाणार नाही. अगर दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

६) प्रवेशाबाबतचे सर्वाधिकार प्राचार्यांचे आहेत व त्यांचा निर्णय याबाबत अंतिम असेल.

७) प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क विद्यापीठ नियमानुसार परत केले जाईल किंवा शुल्क आकाराले जाईल.

## शुल्कासंबंधी नियमः

१) महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना नियमानुसार शुल्क भरावे लागते.

२) प्रवेश रद्द करतांना विद्यापीठ नियमाप्रमाणे प्रवेश शुल्क परत केले जाईल किंवा आकारले जाईल.

३) सत्राचे (Semister) कामकाज सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांने आपला प्रवेश रद्द केला तरी त्यास त्या सत्राचे संपुर्ण शुल्क भरावे लागते. हे शुल्क भरल्याशिवाय दाखला दिला जात जाणार नाही.

४) शासन/विद्यापीठ यांच्या आदेशानुसार शुल्क दरात बदल होऊ शकेल. तो वेळोवेळी विद्यार्थ्यांना सुचना फलकावर कळविला जाईल.

५) शिष्यवृत्ती व फी सवलतधारक विद्यार्थ्यास कोणतेही शिक्षण शुल्क भरावे लागणार नाही. तथापी त्यांनी प्रवेश शुल्क पदवी वर्गासाठी रू. २०/– भरावे.

६) शिष्यवृत्तीधारक व फी सवलतधारक सर्व विद्यार्थ्यांनी आपली खाती केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत उघडणे अनिवार्य आहे. त्या शिवाय त्यांचा फी सवलतीचा व शिष्यवृत्तीचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

७) कमीत कमी ७५% उपस्थिती नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व इतर सवलत मिळणार नाही.

## शिष्यवृत्य फी सवलती :

या महाविद्यालयात सर्व शासकिय शिष्यवृत्या व फी सवलती प्राप्त होऊ शकतात. प्रत्येक शिष्यवृत्ती–फी सवलतीसाठी नियम सूचनाफलकावर लावले जातात. त्यासाठी सूचनाफलकावर निर्धारित केलेल्या दिनांकापर्यंत अर्ज करावा लागतो व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. केवळ अर्ज केला म्हणजे शिष्यवृत्ती मिळते असे नाही. शासकिय छाननीत शिष्यवृत्ती, फी सवलत मंजुर झाल्यानंतर विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती कमी झाल्यास, तो तासांना गैरहजर असल्यास, गैरशिस्तीचे वर्तन दिसून आल्यास त्याला मंजुर झालेली शिष्यवृत्ती अगर फी सवलत रद्द केली जाते. याबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

## महाविद्यालयातील सुविधा व उपक्रम -

### * ग्रंथालय :

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथांचे विशेष दालन आहे. ग्रंथालयात खालील सेवा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातात –

१) संदर्भ ग्रंथ

२) ग्रंथ–सुची (कॅटलॉग)

३) वृत्तपत्र सेवा – कात्रणे

४) नियतकालीके

५) गृहवाचन

६) अभ्यासपत्रिका

७) माहिती केंद्र

८) ग्रंथपरिचय – फलक

९) ग्रंथ परिक्षण – फलक

१०) ग्रंथवार्ता – फलक

११) पुस्तक पेढी

ग्रंथालयातील पुस्तकांची उपलब्धता Online प्रणालीद्वारे (OPAC) उपलब्ध आहे. समोरचा QR कोड स्कॉन करून माहिती घ्यावी.

* बहिस्थ वाचक सभासद सुविधा उपलब्ध आहे.

ग्रंथालय हे ज्ञानाचे सदावर्त आहे. ग्रंथांची हाताळणी जपून करावी. संदर्भ ग्रंथ वाचनाची सवय ठेवावी. विषयातील प्रमुख नियतकालिकांचे बांधणी संच ग्रंथालयात ठेवले आहेत. ग्रंथालयात उपलब्ध ग्रंथसंपदा २८१८ इतके असून नियतकालिके १८ इतकी उपलब्ध आहेत.

**ग्रंथालय नियम –**

१) कामकाजाच्या सर्व दिवशी ग्रंथालय सकाळी ८.०० ते २.३० वाजेपर्यंत खुले राहील. प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालय सेवा व सुविधांचा वापर करतांना स्वत:चे ओखळपत्र जवळ ठेवावे व जेव्हा – केव्हा ग्रंथालय कर्मचारी मागणी करतील तेव्हा ते सादर करावे.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर ग्रंथालयातून ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे. निर्धारीत तारखेनंतर ओळखपत्र वितरीत करण्यात येणार नाही. विशेष बाबतीत व सबळ परिस्थितीतत प्राचार्यांच्या सहीने ओळखपत्र देण्यात येईल.

३) ओळखपत्र हरवल्यास विद्यार्थ्याने ग्रंथालयात कळवावे, तसेच रू. ५० फी भरून ओळखपत्राची दुसरी प्रत मिळविण्यासाठी अर्ज करावा.

४) विद्यार्थी दोन ग्रंथ सात दिवसासाठी नेऊ शकतात. सात दिवसानंतर प्रति दिन रू. २ प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५) पुस्तकाचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. पुस्तक हरवल्यास, फाडल्यास, खराब झाल्यास ही बाब गांभीर्याने हाताळण्यात येईल. अशा वेळेस पुस्तकाचा, साहित्याच्या दिडपट किंवा नियमानुसार किंमत आकारण्यात येईल.

६) एकदा वसुली झाल्यावर कोणतेही हरवलेले वाचणीय साहित्य परत स्विकारण्यात येणार नाही.

७) वापरकर्त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वाचनीय साहित्य, पुस्तके घेतांना वितरण काऊंटर सोडण्यापूर्वी पुस्तके पुर्ण आहेत का ? त्यातील पाने बरोबर आहेत का ? दोष आढळल्यास तो ग्रंथपाल अथवा ग्रंथालयीन कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे. असे साहित्य परत करतेवेळी खराब आढळून आल्यास याबाबत वापरकर्त्यास जबाबदार धरण्यात येऊन नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

८) संदर्भग्रंथ, दुर्मिळ पुस्तके, वर्तमानपत्र, चालू नियतकालिके इत्यादींचा वापर फक्त ग्रंथालयातच बसुन अभ्यासने बंधनकारक आहे. विशेष स्थितीत सभासदांना असे साहित्य ग्रंथपालाच्या परवानगीने वितरीत करण्यात येईल.

९) नवीन आलेली पुस्तके विशेष कालावधीसाठी शोकेसमध्ये अथवा टेबलवर बघावयास ठेवण्यात येतील.

१०) कागदपत्राची छायांकित प्रत किंवा प्रिंट कॉपीराईट कायद्याच्या अधिन राहून वापरू शकतात व त्याचे उल्लंघन झाल्यास सर्वस्वी जबाबदारी वापरकर्त्याची राहील.

११) ग्रंथालयात शांतता व शिस्त पाळली पाहिजे. शिस्त न पाळल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

१२) पुस्तके देवाण – घेवाण व इतर वाचणीय साहित्य विद्यार्थ्यांना वेळापत्रकाप्रमाणे देण्यात येईल.

१३) ग्रंथालयाच्या परिसरात मोबाईल, आयपॉड व इतर संगीत उपकरणे वापरण्यास सक्त मनाई आहे.

१४) ग्रंथालयात खाद्यपदार्थ वापरण्यास सक्त मनाई आहे. ग्रंथालयात स्वच्छता ठेवण्यास विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे.

१५) ग्रंथालयातील साहित्य व साधनसामुग्रीचे कोणत्याही प्रकारे नुकसान केल्यास सभासदत्व रद्द करण्यात येईल.

१६) ग्रंथालयासंबंधी नियमावलीत वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील ते सर्व संबंधीताना बंधनकारक राहील.

१७) एखादे पुस्तक हरवल्यास संबंधित व्यक्तीला हरवलेल्या पुस्तकाच्या जागी नवीन पुस्तक द्यावे लागेल किंवा नियमानुसार पुस्तकाच्या किंमतीच्या दीड पट रक्कम भरावी लागेल.

१८) विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाशी संबंधीत काही तक्रारी असतील त्या सूचना पेटीत टाकाव्यात.

## * परीक्षा विभाग नियम :

१) महाविद्यालयात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येक सेमिस्टरसाठी स्वतंत्र परिक्षा अर्ज भरणे अनिवार्य आहे.

२) परिक्षा अर्ज ऑनलाईन भरून तो अर्ज विहीत परिक्षा शुल्कासह महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

३) निर्धारीत वेळेत परिक्षा अर्ज व परिक्षा शुल्क न भरल्याने होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस परिक्षा विभाग जबाबदार राहणार नाही.

४) विद्यार्थ्यांनी परिक्षा अर्ज भरण्यापूर्वी आपले अनिवार्य, सामान्यस्तर व विशेषस्तर विषय आपल्या विषय शिक्षकांकडून निश्चित करून घ्यावे.

५) प्रत्येक सेमिस्टरच्या अंतर्गत परिक्षा व इतर परिक्षा पूरक उपक्रम विद्यार्थ्यांनी निर्धारित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

६) आरोग्य विषयक समस्येमुळे ज्या विद्यार्थ्यांना अंतर्गत परिक्षा निर्धारीत वेळेत देणे शक्य न झाल्यास प्राचार्याच्या पूर्वपरवानगीने विद्यार्थ्यांच्या लेखी अर्ज व पुरक कागदपत्रे सादर केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांची पुर्नपरिक्षा घेतली जाऊ शकेल.

७) विद्यार्थ्यांना कोणत्याही सबबीवर परिक्षा कक्षात प्रवेश करता येणार नाही.

८) परिक्षा विषयक सूचना व माहिती महाविद्यालयाच्या सुचना फलकात अथवा परिक्षा अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटूनच मिळेल, त्यासाठी कोणत्याही प्राध्यापक अथवा परिक्षा अधिकारी यांना फोनवरून संपर्क करू नये.

## परीक्षेतील गैरप्रकाराबाबत शिक्षा / कारवाई / दंड :

कोणत्याही परीक्षेत कॉपी करणे, पुस्तकचे अथवा वहीचे पान / पाने जवळ बाळगणे, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या अवैध मार्गांचा अवलंब करणे, उत्तरपत्रिका, पुरवणी व अन्य साहित्याची देवाण घेवाण करणे, परिक्षार्थी ऐवजी अन्य व्यक्तिने परीक्षा देणे इत्यादी सर्व कृत्ये दखलपात्र गुन्हा ठरवण्यात आली आहेत. या गुन्ह्यासाठी आणि उद्धटपणाचे वर्तन केल्यास संबंधित विद्यार्थ्यांना अन्य शिक्षा देण्याचा अधिकार केंद्र संचालक व विद्यापीठ अधिकारी यांना आहे. याची परिक्षार्थीनी नोंद घ्यावी. तसेच परीक्षा कालावधीत भ्रमणध्वनी अथवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर यास देखील सक्त मनाई आहे.

## * जिमखाना विभाग :

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागात विविध देशी/विदेशी खेळ खेळण्याची सोय आहे. व्यायामासाठी अत्याधुनिक साधनांनी क्रीडा विभाग समृद्ध आहे. होतकरू खेळाडूंना विशेष मार्गदर्शन दिले जाते, तसेच विविध स्पर्धांना पाठविले जाते.

प्रथम वर्ष वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.

## * आरोग्य तपासणी :

तज्ञ डॉक्टरांकडून विद्यार्थी व विद्यार्थीनींची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते. रक्तदान शिबीर, रक्तगट चाचणी, दंतचिकीत्सा, एड्स जनजागृती, सामान्य आरोग्य चिकित्सा इ. विषयांवर तज्ञ डॉक्टरांची व्याख्याने आयोजित केली जातात.

## * स्पर्धा परीक्षा केंद्र :

१) महाविद्यालयात स्वतंत्र स्पर्धा परीक्षा कक्ष असून विद्यार्थ्यांना MPSC, UPSC, SET, BANKING इ. स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केले जाते.

२) महाविद्यालयात नियमित व्याख्याने, कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

३) स्पर्धा परीक्षेसंदर्भात लागणारी पुस्तके विद्यार्थ्यांना ग्रंथालयातुन पुरविले जातात.

४) सामान्यज्ञान परीक्षेची तयारी करून घेण्याकरीता सराव परीक्षा घेतली जाते.

५) सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा केंद्रात नाव नोंदणी करणे बंधनकारक राहिल.

## * राष्ट्रीय सेवा योजना :

१) या योजनेमध्ये १०० विद्यार्थी, विद्यार्थीनींना प्रवेश दिला जातो.

२) व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जाणीव व जोपासना, नेतृत्वगुणांचे संवर्धन इ. दृष्टीने या योजनेतील उपक्रम अत्यंत उपयुक्त असतात.

३) वर्षभरात किमान १२० तास सामाजिक / सामुहिक कार्य करावे लागते.

४) वर्षातुन एक विशेष शिबीर आयोजित केले जाते.

५) या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना समाजविज्ञान, अध्यापन, नियोजन इत्यादी क्षेत्रांतील प्रगत शिक्षण व रोजगार याबाबत तज्ञ व्याख्यात्यांकडून मार्गदर्शन मिळते.

६) विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्रही मिळते.

७) विद्यार्थ्यास एकूण १० गुण विशेषत्वाने मिळतात.

## ✻ विद्यार्थी समुपदेशन :

महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे नियम, शिस्त, अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम, विविध जयंती आदी बाबत जनजागृती, जाणीव व महत्व इ. समुपदेशन केले जाते. विद्यार्थ्यांचा दैनंदिन आहार, आरोग्य, व्यायाम,व्यसनांचे दुष्परिणाम, ताण–तणाव इ. बाबतीतही समुपदेशन केले जाते.

## ✻ स्वयं रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र :

पदवी शिक्षणा सोबतच शिक्षणाचा उपयोग व्यवसायाकरीता पूरक होईल याबाबतचे मार्गदर्शन केले जाते. तसेच स्थानिक उपलब्ध स्त्रोतांमधून पूरक असे व्यवसाय उदा. विविध कलाकृती, शासनाच्या विविध योजना, बँकाचे विविध व्यवसायांसाठी कर्जपुरवठा, लघुउद्योग व जनशिक्षण संस्थेमार्फत विविध १२ कोर्सेस चालविले जातात इ. बाबत मार्गदर्शन केले जाते.

## ✻ व्यवसाय व कौशल्य विकास अभ्यासक्रम :

**(Career Oriented & Skill Development Courses)**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरीता महाविद्यालयात कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार पुरक असे अभ्यासक्रम कला आणि वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण आणि जनशिक्षण संस्था नाशिक यांच्या संयुक्त विद्यामाने सुरू करण्यात आलेले आहे. स्थानिक उपलब्ध स्त्रोतांमधुन स्वयंरोजगार पूरक असे व्यवसाय आणि कौशल्य विकासाचे शिक्षण प्रशिक्षण दिले जाते.

उदा. बांबूपासून विविध वस्तू बनविणे ✻ बँकांचा विविध व्यवसायासाठी कर्ज पूरवठा
✻ शासनाच्या विविध योजना ✻ लघुउद्योग मार्गदर्शन

## ✻ विद्यार्थीनी मंच :

१) महाविद्यालयातील विद्यार्थीनींना व्यक्तीमत्व विकास, स्व–संरक्षण, वैयक्तीक, मार्गदर्शन इ. करीता विद्यार्थीनी मंचची स्थापना केली आहे.

२) या मंचाद्वारे महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित केले जातात.

३) सांस्कृतिक दिवस, वेशभूषा, विविध स्पर्धा, मान्यवरांची व्याख्याने, कार्यशाळा इ. चे आयोजन केले जाते.

## * कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे अंतर्गत विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्तपणे महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजु आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे हे प्रमुख उद्दिष्ट सध्या करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो.

१) चालू शैक्षणिक वर्षात तसेच, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो.

२) या योजनेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न हे ५,००,०००/- च्या आत असणे आवश्यक आहे.

३) सदर विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला मा. तहसीलदार, यांचे स्वाक्षरीचा असावा.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश घेण्यासाठी विशेषत: प्राधान्य दिले जाते.

५) या योजनेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमाप्रमाणे प्रत्येक तासाला रू. ४५/- मेहनताना दिला जातो.

६) या योजनेंतर्गत प्रत्येक दिवशी कार्यालयीन कामासाठी जास्तीत जास्त ४ तास आणि फिल्ड वर्क कामासाठी जास्तीत जास्त ३ तास असतील.

७) ही योजना एका शैक्षणिक वर्षात ३ महिने सुरू असते.

# महाविद्यालयातील शिस्त व नियम

# विद्यार्थ्यांकडून शिस्त पालन आणि सद्वर्तन

(पुणे विद्यापीठ कायदा १९७४ च्या कलम ८७ आणि कलम ३९ (३) नुसार)

**अ) कला आणि वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण या महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी सदैव -**

१) आपले वर्तन चांगले ठेवेल.

२) आचरण चांगले ठेवेल.

३) महाविद्यालयाच्या आवारात तसेच महाविद्यालयाबाहेर, एस.टी.बसमध्ये, सार्वजनिक ठिकाणी, महाविद्यालयाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलींच्या ठिकाणी, मैदानावर शिस्तीचे काटेकोर पालन करेल.

४) जाणते-अजाणतेपणाने महाविद्यालयाची अपकिर्ती होईल असे वर्तन घडणार नाही याची दक्षता घेईल.

५) महाविद्यालयाच्या कोणत्याही बाबींसंबंधी कोणतीही बातमी अथवा निवेदन वर्तमानपत्राकडे अथवा बाहेरील संस्थेकडे/एजन्सीकडे, महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फतच देईल.

**६) प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालयाने ठरवून दिलेला ड्रेसकोड वापरणे बंधनकारक राहील.**

## ब) कॉलेज कलम (१)

मधील तरतुदींच्या विरूद्ध असणारी विद्यार्थ्यांची कोणतीही कृती ही गैरवर्तणूक किंवा बेशिस्त म्हणून समजली जाईल व ह्यामध्ये खालील परिच्छेदात वर्णन केलेल्या व्यक्तिश: अथवा सामूहिकरित्या केलेल्या कृतींचा समावेश असेल -

१) महाविद्यालयाचे कामकाज कायद्याला धरून चालण्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अडथळा निर्माण करणारी किंवा अडथळा निर्माण होण्याच्या दृष्टीने कारणीभूत ठरणारी कोणतीही कृती.

२) जे तास, प्रात्यक्षिके, ट्युटोरिअल्स आणि अन्य कोर्सेसना उपस्थित राहणे आवश्यक असेल त्यांना गैरहजर राहण्याची सवय.

३) तास, ट्युटोरिअल्स, प्रात्याक्षिके आणि अन्य कोर्सेस यांना नियमितपणे अनुपस्थित राहणे.

४) प्राचार्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय देणग्या प्राप्त करण्यासाठी प्रचार करणे किंवा त्या प्राप्त करणे किंवा एखादी वस्तु अथवा निधी गोळा करण्याच्या उपक्रमात सहभागी होणे.

५) वस्तुस्थिती अथवा सत्य माहिती लपवून पदवी, पदव्युत्तर अथवा अन्य अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणे.

६) महाविद्यालयाच्या आवारात वर्गातील, प्रयोगशाळेतील, मैदानावरील, जिमखान्यातील अथवा सामाजिक किंवा सांस्कृतिक उपक्रमातील एखाद्या विद्यार्थ्यांला अथवा विद्यार्थ्यांच्या गटाला अडथळा निर्माण करणे.

७) महाविद्यालयाच्या आवारात स्फोटके, शस्त्रे, प्राणघातक शस्त्रास्त्रे किंवा धोकादायक पदार्थ जवळ बाळगणे अथवा त्यांचा वापर करणे.

८) महाविद्यालयात कोणतेही विषारी, मादक द्रव्य अथवा मद्य कोणत्याही स्वरूपात बाळगणे अथवा सेवन करणे.

९) महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाच्या बाहेर तंबाखू किंवा तत्सम पदार्थ खाऊन पिचकारी मारून भोवतालचा परिसर अस्वच्छ करणे व एखाद्या विद्यार्थ्यांला छळणे किंवा रॅगिंग करणे.

१०) कोणत्याही विद्यार्थ्यांला, महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याच्या कुटूंब सदस्याला त्रास होईल अथवा अडचण निर्माण करणारी गोष्टी करणे.

११) महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाच्या बाहेर हिंसाचार, हल्ला, दहशतवादी कृत्ये करणे अथवा धमकी देणे.

१२) महाविद्यालयाचे रेकॉर्ड नाहीसे करणे त्यात फेरबदल करणे.

१३) महाविद्यालयात आयोजित केलेल्या कोणत्याही सभेस अथवा सांस्कृतिक कार्यक्रमात अथवा खास कार्यक्रमात अथवा अन्य सार्वजनिक ठिकाणी विद्यार्थ्यांस न शोभणारे वर्तन करणे.

१४) महाविद्यालय अथवा महाविद्यालयाचे कर्मचारी अथवा विद्यार्थी यांच्या मालमत्तेचे नुकसान करणे अथवा त्याची चोरी करणे.

१५) महाविद्यालयात हिंसाचारास चिथावणी देणे किंवा हिंसाचारी कृत्यात अथवा प्रक्षोभक चळवळीत अथवा हिंसक संपात सहभागी होणे.

१६) महाविद्यालयाच्या एखाद्या कर्मचाऱ्यास अथवा अधिकाऱ्यास घेराव घालण्यास चिथावणी देणे अथवा घेराव्यात सहभागी होणे. महाविद्यालयाच्या परिसरातील इमारतींच्या भिंतीवर किंवा अन्य ठिकाणी आक्षेपार्ह लेखन करणे व चित्रे काढणे.

१७) महाविद्यालयात कोणत्याही स्वरूपात जुगार खेळणे.

१८) स्वत: विरूद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्याने नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्यापुढे साक्ष देण्यास नकार देणे.

१९) कोणत्याही स्वरूपात गोंधळ निर्माण करणारे वर्तन करणे अथवा अधिकाऱ्याने खास करून मना केलेले वर्तन करणे.

२०) न्यायालयात गुन्हा केल्यामुळे दोषी म्हणून सिद्ध झालेला असणे आणि नैतिक अध:पतनाचा समावेश असलेला गुन्हा करणे.

२१) आतापर्यंत विशेष उल्लेख नसलेले कृत्य परंतु त्या विशिष्ट परिस्थितीत अधिकाऱ्यांना वाटलेले गैरकृत्य करणे अथवा बेशिस्त माजविणे.

२२) महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल बाळगणे / वापरणे.

२३) शिक्षकांशी/कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालणे.

२४) महाविद्यालयाच्या परिसरात जोराने बोलणे/दंगा करणे.

## शिस्त :

विद्यार्थ्यांना मिळालेले ओळखपत्र त्यांनी नियमीत आपल्यासोबत बाळगले पाहिजे. जेव्हा जेव्हा संबंधित अधिकाऱ्याकडून मागणी केली जाईल, तेव्हा तेव्हा ते सादर केले पाहिजे. महाविद्यालयात येतांना ओळखपत्र गळ्यात घालणे आवश्यक आहे.

विद्यापीठाने ठरवून दिलेली प्रत्येक विद्यार्थ्यांची प्रत्येक सत्रातील तासांना व प्रात्यक्षिकांना (७५ टक्के) किमान उपस्थिती असलीच पाहिजे. महाविद्यालयाने आणि पुणे विद्यापीठाने नेमून दिलेला अभ्यासक्रम, ट्युटोरिअल्स, गृहपाठ, चाचण्या व प्रात्यक्षिके प्रत्येक विद्यार्थ्यांने संबंधित विषय शिक्षक व प्राचार्यांचे समाधान होईल अशा पद्धतीने पुर्ण केले पाहिजेत. विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक नसेल अथवा जे विद्यार्थी महाविद्यालयाच्या सर्व उपक्रमांत समाधानकारक उपस्थिती राखु शकले नाहीत तर त्यांना विद्यापीठाच्या परिक्षेस बसू दिले जाणार नाही. महाविद्यालयात प्रवेश घेतांना व कोणत्याही परीक्षेचा फॉर्म भरतांना संबंधित विद्यार्थी हजर असणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी आखून दिलेले शिस्तीचे नियम पाळावेत, सर्वच बाबतीत प्राचार्यांचा निर्णय हा अंतिम असेल व सर्व विद्यार्थ्यांवर तो बंधनकारक असेल. जे विद्यार्थी सायकली, स्वयंचलित दुचाकी वाहने इ. महाविद्यालयात आनत असतील तर महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या पार्किंग परिसरातच वाहने लावावीत, अन्य कोणत्याही जागी विद्यार्थ्यांना वाहने लावण्यास सक्त मनाई आहे.

***

# पालकांसाठी सूचना

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या आई/वडील/पालकांनी आपल्या पाल्याचा अभ्यास तसेच वर्तनाबद्दल जागरूक असावे. विद्यार्थ्यांची वर्गामधील उपस्थिती, वर्तन, परीक्षांचे निकाल, अभ्यासाव्यतिरिक्त त्यांचे वर्तन याबाबत पालकांना माहिती कळवण्याचा प्राचार्य आटोकाट प्रयत्न करतात. परंतु विशेषतः खालील गोष्टींच्या संदर्भात पालकांचे अधिक सक्रिय सहकार्य अपेक्षित आहे.

१) सर्व परिक्षांना किंवा स्वाध्यायांना आपला पाल्य उपस्थित राहतो का ? याची पालकांनी खात्री करून घ्यावी व योग्य कारणामुळे आपला पाल्य परीक्षांना किंवा स्वाध्यायांना उपस्थित राहु शकला नाही तर पालकांनी प्राचार्यांची खात्री पटवून द्यावी.

२) आपल्या पाल्याच्या वर्तनाच्या संदर्भात महाविद्यालयाकडून पत्र आल्यास पालकांनी त्याची गंभीर दखल घ्यावी, अशा परिस्थितीत पालकांनी प्राचार्यांना व्यक्तीशः भेटणे आवश्यक आहे.

३) पुष्कळदा आपल्या पाल्याचा महाविद्यालयात अभ्यास कसा चालला आहे याची पालकांना काहीच कल्पना नसते. परीक्षेमध्ये त्याला मिळणारे गुण किंवा त्याची वर्तणूक या बाबतीत महाविद्यालयास एखादे वेळी कडक उपाय योजना करणे भाग पडते. सर्व परिस्थिती आवाक्याबाहेर गेल्यावर पालकांना त्याची कल्पना येते. सर्वांना त्याचा त्रास सोसावा लागतो व गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून पालकांनी प्राचार्य व प्राध्यापक यांच्याशी अधुनमधून संपर्क ठेवल्यास ते स्वागतार्ह मानले जाईल.

४) विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेतील तीन महत्वाचे घटक आहेत. त्या दृष्टीने पालकांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर अधिकारी वर्ग यांना योग्य ते सहकार्य करावे.

***

# महत्वाचे

१) महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी सादर करावयाच्या (गुणपत्रक/दाखला) आवश्यक तेवढ्या झेरॉक्स प्रती काढून घ्याव्यात. कागदपत्रे सादर केल्यानंतर कोणत्याही सबबीवर मूळ कागदपत्रे परत मिळणार नाहीत.

२) महाविद्यालयात एकदा प्रवेश घेतल्यानंतर केव्हाही महाविद्यालय सोडले तरी संपूर्ण टर्मची फी भरावी लागते.

३) एकदा भरलेले शुल्क विद्यापीठ नियमानुसार परत मिळेल किंवा भरले नसल्यास आकारले जाईल.

४) विशेष करून सर्व विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) व प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) या दिवशी होणाऱ्या ध्वजवंदनाला व कार्यक्रमांना उपस्थित रहाणे आवश्यक आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

५) भारत सरकार शिष्यवृत्ती / महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची उपस्थिती कमीत कमी ७५% असणे आवश्यक आहे.

६) महाविद्यालयात येतांना विद्यार्थ्यांकडे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.

७) २.३० ते ३.३० या काळात विद्यार्थ्यांनी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, एन.एस.एस. उपक्रमात भाग घेणे अनिवार्य आहे.

वरील नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांची गंभीर दखल घेण्यात येईल.

## * महाविद्यालयाची वेळ *

सोमवार ते शनिवार : सकाळी ०८.०० ते ०२.३०

## * कार्यालयीन वेळ *

| | | | |
|---|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | : | सकाळी १०.०० ते ०१.३० | दुपारी ०२.०० ते ०५.०० |
| शनिवार | : | सकाळी १०.०० ते ०१.३० | |
| आर्थिक व्यवहार | : | सकाळी १०.३० ते ०१.०० | |

## ✻ जल प्रतिज्ञा ✻

✻ मी माझ्या जीवनदायिनी विषयी सदैव कृतज्ञ राहिन.

✻ पाणी हे जीवन आहे, तसेच पाणी हे मौल्यवान आहे. पाणी फुकट मिळते ही धारणा मी मनातून काढून टाकीन.

✻ पाण्याचा काटकसरीने वापर करीन, त्याचबरोबर जल संवर्धनासाठी कसोशीने प्रयत्न करीन.

✻ पाण्यावर माझ्या इतकाच इतरांचाही हक्क आहे. 'सम न्यायाने सर्वांसाठी पाणी' ही भावना मी सतत जोपासेन.

✻ जीवनदायिनी प्रदुषित होणार नाही यासाठी मी व्यक्तिश: प्रयत्न करीन, तसेच माझ्या बंधु भगिनींना सुद्धा याची जाणीव करून देईन.

✻ सांडपाण्याच्या प्रश्नांची तीव्रता मला समजलेली असून घरगुती कारणासाठी मी कमीत कमी पाणी वापरीन.

✻ धरणांमध्ये ज्यांची घरे, शेती पाण्याखाली गेली आहे त्यांच्या विषयी मी सतत कृतज्ञ राहीन.

✻ सर्वांसाठी पाणी या प्रक्रियेत मी माझ्या बंधु भगिनींचा सहभाग मिळवीन व यासाठी विविध पातळीवर कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांना मी सदैव सहकार्य करीन.

## ✻ पर्यावरण प्रतिज्ञा ✻

✻ माझ्या भोवतालच्या परिसर माझा आहे.

✻ परिसरातील सारे पर्यावरण माझे आहे.

✻ पर्यावरण स्वच्छ, सुंदर व मंगल राखणाऱ्या निसर्गावर माझे प्रेम आहे.

✻ माझ्या परिसरातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या निसर्गाचा मला अभिमान आहे.

✻ पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या निसर्गाचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

✻ मी माझ्या परिसराच्या, गावाच्या आणि देशाच्या पर्यावरणाचा तोल राखणाऱ्या निसर्गाचा मान ठेवीन आणि त्याची काळजी घेईल.

✻ माझा परिसर आणि परिसरातील पर्यावरण यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.

✻ परिसर आणि पर्यावरणाचा तोल राखणाऱ्या निसर्गाचा आणि नैसर्गिक जीवनाचा विकास आणि समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

**SAVE WATER & ELECTRICITY**

## रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाय योजनेखाली महत्वाची सूचना

'महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिनियम, १९९९' नुसार, महाविद्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे रॅगिंग करणेस सक्त मनाई आहे. जर विद्यार्थी रॅगिंग करतांना आढळल्यास त्यास महाविद्यालयातून काढून टाकले जाईल आणि वरील अधिनियम १९९९, नुसार सदरील विद्यार्थ्यावर कायदेशिर कारवाई केली जाईल.

प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी, या पूर्वी रॅगिंग करण्यात गुंतला असेल तर त्याला प्रवेश नाकारला जाईल. तसेच प्रवेश दिल्यानंतर असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यात गुंतला होता, तर त्यास निष्काशित केले जाईल.

वरील अधिनियम १९९९, नुसार सोबतचे संयुक्त प्रतिज्ञापत्र विद्यार्थी व पालक या दोघांनीही प्रवेश अर्जा सोबत भरून देणे अनिवार्य आहे.

### * भविष्यातील नियोजन (Future Plans)

१) व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरू करणे.

२) व्यवसायाभिमूख कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करणे.

३) विज्ञान शाखेत पदवी अभ्यासक्रम सुरू करणे.

४) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र व कार्यशाळा आयोजीत करणे.

५) MPSC / UPSC / Railway Recruitment / Forest / Police / Forensic Science / Entrance Exam of ICT, IIT इ. चे मार्गदर्शन केंद्र सुरू करणे

६) विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे.

७) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्याबरोबर सहयोग (Collaboration) करणे.

८) पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरू करणे.

## Subject Index

Subject List for Commerce Faculty

| Class | Semester | Cource Code | Subject / Cource Name |
|---|---|---|---|
| **FYBCOM** | **I** | 112 | Financial Accounting-I |
| | | 114B | Computer Concept and Application-I |
| | | 116E | Business Environment and Enterprenership-I |
| | | 113 | Business Economics (Micro)-I |
| | | 117B | Basha, sahitya aani Kaushalya vikas |
| | | 115C | Commercial Geography-I |
| | | 111 | Compulsory English-I |
| | | 12019-VA01_1 | Computerized Accounting |
| **FYBCOM** | II | 122 | Financial Accounting-II |
| | | 124B | Computer Concept and Application-II |
| | | 126E | Business Environment and Enterprenership-II |
| | | 123 | Business Economics (Micro)-II |
| | | 127B | Bhasha ani Koushalya Vikas |
| | | 125C | Commercial Geography-II |
| | | 121 | Compulsory English-II |
| | | G1 | Physical Education Scheme |
| | | 12019-VA05_02 | Value Education |
| **SYBCOM** | **III** | 232 | Corporate Accounting-I |
| | | 231 | Business Communication-I |
| | | 234 | Business Management-I |
| | | 233 | Business Economics (Macro)-I |
| | | 236B | Banking and Finance-I |
| | | 235 | Elements of Company law-I |
| | | 239 | Environmental Awareness |
| **SYBCOM** | **IV** | 242 | Corporate Accounting-II |
| | | 241 | Business Communication-II |
| | | 244 | Business Management-II |
| | | 243 | Business Economics (Macro)-II |
| | | 246B | Banking and Finance-II |
| | | 245 | Elements of Company law-II |
| | | 249 | Environmental Awareness |
| **TYBCOM** | **V** | 352 | Advanced Accounting - I |
| | | 354 | Auditing and Taxation - I |
| | | 351 | Business Regulatory Frame Work- I |
| | | 353B | Intrnational Economics- I |
| | | 355B | Banking and Finance-II (Part - I) |
| | | 356B | Banking and Finanace-III (Part - I) |
| **TYBCOM** | **VI** | 362 | Advanced Accounting - I |
| | | 364 | Auditing and Taxation - I |
| | | 361 | Business Regulatory Frame Work- I |
| | | 363B | Intrnational Economics- I |
| | | 365B | Banking and Finance-II (Part - II) |
| | | 366B | Banking and Finanace-III (Part - II) |

| Subject List for Arts Faculty | | | |
|---|---|---|---|
| **Class** | **Semester** | **Cource Code** | **Subject / Cource Name** |
| **FYBA** | **I** | 11011 | Compulsory English-I |
| | | 11021A | Marathi Sahitya: Katha & Bhashik Kaushalya Vikas |
| | | 11151 | Indian Economic Environment-I |
| | | 11161 | Introducation to Indian Constitution -I |
| | | 110B | Human Geography |
| | | 11171 | Early India: From Prehistory to the Age of the Mauryas |
| | | G-1 | Physical Education ( Sem-I) |
| **FYBA** | **II** | 12001 | COMPULSORY ENGLISH-II |
| | | 12021 | MARATHI SAHITYA : AKANKIKA & BHASHIK KOUSHALYAVIKAS |
| | | 12151 | INDIAN ECONOMIC ENVIRONMENT-II |
| | | 12161 | INTRODUCTION TO INDIAN CONSTITUTION-II |
| | | 12171 | EARLY INDIA :POST MAURYAN AGE TO THE RASHTRAKUTAS |
| | | 12201 | HUMAN GEOGRAPHY |
| | | GR1 | PHYSICAL EDUCATION (GROUP-I, SEM-I) |
| | | 12999 | DEMOCRACY, ELECTION AND GOVERNANCE |
| **SYBA** | **III** | 23001 | Compulsory English |
| | | 23153 | Financial System |
| | | 23151 | Micro Economics |
| | | 23152 | Macro Economics |
| | | 23153 | Research Methodology |
| | | 23023 | Bhashik Kaushalya vikas aani Aadunik Marathi Sahitya prakar: Kadambari G-2 |
| | | 23021 | Aadunik Marathi Sahitya:Prakashavata Spl-1 |
| | | 23022 | Sahityavichar Spl-2 |
| | | 23025 | Prakashan Vyavahar Aani Sampadan (skill based) |
| | | 23011 | Marathi Bhashik Sandyapan Kaushalya (MIL) |
| | | 23174 | History of the Marathas: (1630-1707) |
| | | 23171 | Medieval India - Sultanate Period |
| | | 23172 | Glimpses of the Modern World - Part I |
| | | 23175 | Brahmi Script |
| | | 23161 | Western Political Thought |
| | | 23162 | Political Journalism |
| | | 23164 | An Introduction to Political Ideology |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 23165 | Basic of Indian Constitution -Skill Based |
| | | 23204 | GG201(A) ENVIRONMENTAL GEOGRAPHY-I |
| | | 23999 | ENVIRONMENTAL SCIENCE |
| **SYBA** | **IV** | 24001 | Compulsory English |
| | | 24153 | Financial System |
| | | 24151 | Micro Economics |
| | | 24152 | Macro Economics |
| | | 24153 | Research Methodology |
| | | 24023 | Bhashik Kaushalya vikas aani Aadunik Marathi Sahitya prakar: Lalit Gadya G-2 |
| | | 24021 | madhyayugin Marathi Sahitya: Nivadak Madhyayugin Gadya, Padya. Spl-1 |
| | | 24022 | Samiksha vichar Spl-2 |
| | | 24025 | Upayojit Lekhan kaushalya ( skill based) |
| | | 24011 | Nav Madhyame Aani Samaj Madhyamansathi Marathi(MIL) |
| | | 24174 | History of the Marathas: (1707-1818) |
| | | 24171 | Medieval India: Mughal Period |
| | | 24172 | Glimpses of the Modern World - Part II |
| | | 24175 | Modi Script |
| | | 24161 | Western Political Thought Spl-1 |
| | | 24162 | Political Journalism Spl-2 |
| | | 24164 | An Introduction to Political Ideology |
| | | 24165 | Basic of Indian Constitution |
| | | 24204 | GG201(B) ENVIRONMENTAL GEOGRAPHY -II |
| | | 24999 | ENVIRONMENTAL SCIENCE |
| **TYBA** | **V** | 35001 | COMPULSORY ENGLISH -I |
| | | 35002 | GENERIC ELECTIVE |
| | | 35151 | DSE-1D INTERNATIONAL ECONOMICS - I |
| | | 35152 | DSE-2D PUBLIC FINANCE - I |
| | | 35153 | CC-1F INDIAN ECONOMIC DEVELOPMENT - I |
| | | 35154 | SEC-2D BUSINESS MANAGEMENT - I (PROJECT REPORT) |
| | | 35021 | DSE-1C MADHYAYUGIN MARATHI VANGAMAYACHA STHUL ITIHAS :PRARAMBH TE A |
| | | 35022 | DSE-2C VARNATMAK BHASHAVIDYAN : BHAG 1 |
| | | 35023 | CC-1E BHASHIK KAUSHALYAVIKAS ANI ADHUNIK MARATHI SAHITYA PRAKAR: P |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 35025 | SEC-2C KARYAKRAM SANYOJANATIL BHASHIK KAUSHALYE : BHAG 1 |
| | | 35161 | DSE-1C PUBLIC ADMINISTRATION |
| | | 35162 | DSE-2C INTERNATIONAL RELATIONS |
| | | 35163 | LOCAL SELF GOVERNMENT IN MAHARASHTRA |
| | | 35165 | SEC-2C SAMYUKTA MAHARASHTRA MOVEMENT |
| | | 35171 | DSE-1C INTRODUCTION TO HISTORIOGRAPHY |
| | | 35172 | DSE-2C MAHARASHTRA IN THE 19TH CENTURY |
| | | 35174 | CC-1E INDIAN NATIONAL MOVEMENT (1885- 1947) |
| | | 35176 | SEC-2C SOUTH INDIAN ART & ARCHITECTURE |
| | | 35204 | CC-1E GG310(A) GEOGRAPHY OF DISASTER MANAGEMENT -I |
| **TYBA** | **VI** | 36001 | COMPULSORY ENGLISH -II |
| | | 36002 | GE-2A GENERIC ELECTIVE |
| | | 36151 | DSE-1D INTERNATIONAL ECONOMICS - II |
| | | 36152 | DSE-2D PUBLIC FINANCE - II |
| | | 36153 | CC-1F INDIAN ECONOMIC DEVELOPMENT - II |
| | | 36154 | SEC-2D BUSINESS MANAGEMENT - II (PROJECT REPORT) |
| | | 36021 | DSE-1D MADHYAYUGIN MARATHI VANGAMAYACHA STHUL ITIHAS :A.D.1601 TO A.D. |
| | | 36022 | DSE-2D VARNATMAK BHASHAVIDYAN : BHAG 2 |
| | | 36023 | CC-1F BHASHIK KAUSHALYAVIKAS ANI ADHUNIK MARATHI SAHITYA PRAKAR: KAVI |
| | | 36025 | SEC-2D KARYAKRAM SANYOJANATIL BHASHIK KAUSHALYE : BHAG 2 |
| | | 36161 | DSE-1D PUBLIC ADMINISTRATION |
| | | 36162 | DSE-2D INTERNATIONAL RELATIONS |
| | | 36163 | CC-1F LOCAL SELF GOVERNMENT IN MAHARASHTRA |
| | | 36165 | SEC-2D SAMYUKTA MAHARASHTRA MOVEMENT |
| | | 36171 | DSE-1D APPLIED HISTORY |
| | | 36172 | DSE-2D MAHARASHTRA IN THE 20TH CENTURY |
| | | 36174 | CC-1F INDIA AFTER INDEPENDENCE-(1947- 1991) |
| | | 36176 | SEC-2D ARCHAEOLOGY |
| | | 36204 | CC-1F GG310(B) GEOGRAPHY OF DISASTER MANAGEMENT -II |

**टीप : वरील विषय काळजीपूर्वक वाचून प्रवेश अर्ज भरावा आणि परिक्षा फॉर्म भरतेवेळी वरील प्रमाणे विषय ऑनलाईन निवडावे.**

डांग सेवा मंडळ, नाशिक

# विद्यमान कार्यकारिणी मंडळ



श्रीम. हेमलताताई विजय बिडकर
अध्यक्षा



श्री. दामु पांडु ठाकरे
उपाध्यक्ष



ॲड. सौ. मृणाल शाम जोशी
सचिव



श्री. प्रभाकर सुपडू पवार
संचालक



श्री. अरविंद प्रल्हाद देशपांडे
संचालक



श्री. श्रीकृष्ण र. चंद्रात्रे
संचालक



श्री. अनिल पंडीत
सेवक प्रतिनिधी

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# कला आणि वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण

## गौरवपूर्ण कामगिरी

''महाविद्यालयाच्या आठवणीतील सुवर्ण क्षण''

**'उंबरठा'**

नियतकालिक स्पर्धा २०१७-१८
(अव्यावसायिक विभाग)

विभागस्तरीय (नाशिक विभागातून)
(तृतीय क्रमांक)

**पारितोषिक**

पारितोषिक प्राप्त
दिनांक २५/११/२०२१









''महाविद्यालयाच्या आठवणीतील सुवर्ण क्षण''

**'उंबरठा'**

नियतकालिक स्पर्धा २०१९-२०
(अव्यावसायिक विभाग)

विद्यापीठस्तरीय
(चतुर्थ क्रमांक - विभागुन)

**पारितोषिक**

पारितोषिक प्राप्त
दिनांक २५/११/२०२१









''महाविद्यालयाच्या आठवणीतील सुवर्ण क्षण''

**जगन्नाथ राठी पारितोषिक**




**सन २०१९-२०२०**

पारितोषिक प्राप्त
दिनांक १०/०२/२०२०








